पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.महिला व बालकल्याण समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - १९

**सभावृत्तांत**

दिनांक - **०६/०२/२०१८** वेळ – दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची पाक्षिक सभा मंगळवार दिनांक **०६/०२/२०१८** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. **मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे - उपसभापती**
२. मा.आंगोळकर सागर सुनिल
३. मा.लोखंडे चंदा राजू
४. मा. सुलक्षणा राजू धर
५. मा.दर्शले रेखा राजेश

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.ऐवले – समाज विकास अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.१) बालवाडी समन्वयक व मुख्य समन्वयक यांच्या मानधनात वाढ करणेबाबत - मा. योगिता नागरगोजे, मा.चंदा लोखंडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२) बालवाड्यांना चटया पुरविणेबाबत- मा. योगिता नागरगोजे, मा.चंदा लोखंडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३) पिंपरी चिंचवड शहरातील महिला पोलिसांसाठी पोलिस स्टेशन मध्ये सार्वजनिक शौचालये व सॅनिटरी नॅपकीनचे व्हेंडींग मशिन्स व डिस्पोजल मशिन्स बसविणेबाबत – मा.सुलक्षणा धर, मा.चंदा लोखंडे यांचा प्रस्ताव.

----------

**खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.**

सुचक – मा.रेखा दर्शले                                    अनुमोदक – मा. लोखंडे चंदा

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची दि. ०६/०२/२०१८ ची पाक्षिक सभा मंगळवार दिनांक **२०/०२/२०१८** रोजी सकाळी **११.००** वाजेपर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

---------

**मा.उपसभापती -** मंगळवार दिनांक **२०/०२/२०१८** रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

**(मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे)**
**उपसभापती**
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.महिला व बालकल्याण समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - १९

**सभावृत्तांत**

**(** दिनांक ०६/०२/२०१८ ची तहकूब सभा **)**

**दिनांक – २०/०२/२०१८** **वेळ – सकाळी ११.०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची दि. ६/२/२०१८ ची तहकूब सभा मंगळवार दिनांक **२०/०२/२०१८** रोजी सकाळी ११**.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. **मा.तापकिर सुनिता हेमंत - सभापती**
२. मा.लोखंडे चंदा राजू
३. मा.दर्शले रेखा राजेश

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.ऐवले – समाज विकास अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.**

सुचक – मा.लोखंडे चंदा अनुमोदक – मा. रेखा दर्शले

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची दि. २०/०२/२०१८ रोजी सकाळी **११.००** ची तहकूब सभा बुधवार दिनांक **२१/०२/२०१८** रोजी सकाळी **११.००** वाजेपर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

---------

**मा. सभापती -** बुधवार दिनांक **२१/०२/२०१८** रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

**(मा.तापकिर सुनिता हेमंत)**
**सभापती**
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.**

मा.महिला व बालकल्याण समिती

**कार्यपत्रिका क्रमांक - १९**

**सभावृत्तांत**

( दिनांक **०६/०२/२०१८ व २०/०२/२०१८** ची तहकूब सभा )

दिनांक - **२१/०२/२०१८** वेळ – सकाळी **११.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची दि.२०/२/२०१८ ची तहकूब सभा मंगळवार दिनांक **२१/०२/२०१८** रोजी सकाळी ११**.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.सुनिता हेमंत तापकीर - सभापती**
२. मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे - उपसभापती
३. मा.आंगोळकर सागर सुनिल
४. मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर
५. मा.लोखंडे चंदा राजू
६. मा.सुलक्षणा राजू धर
७. मा.कदम निकिता अर्जुन
८. मा.दर्शले रेखा राजेश

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.ऐवले – समाज विकास अधिकारी, मा.जगदाळे - सहा. प्रकल्प अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

दिनांक २/१/२०१८, १६/१/२०१८ व दिनांक ३०/०१/२०१८ रोजी झालेल्या सभेचा (**कार्यपत्रिका क्रमांक १८**) कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक - ३५ विषय क्रमांक - ०१
दिनांक - २१/०२/२०१८
सुचक : मा. योगिता नागरगोजे अनुमोदक : मा.चंदा लोखंडे
संदर्भ : मा. योगिता नागरगोजे, मा.चंदा लोखंडे यांचा प्रस्ताव –

शिक्षण विभागाच्या एकूण २०६ बालवाड्या आहेत. बालवाडीचे काम व्हावे तसेच योग्य समन्वय साधता यावा यासाठी जेष्ठ बालवाडी शिक्षिका यांच्या २००९ मध्ये समन्वयक व मुख्य समन्वयक यांना नेमणूका देण्यात आलेल्या आहेत. १९८८ पासून त्या अगदी तुटपुंज्या मानधनावर काम करत असून सध्या पिंपरी चिंचवड व भोसरी ह्या विभागातून समन्वयक शाळेंना भेटी देवून बालवाडीचा दर्जा सुधारण्यासाठी विविध उपक्रम घेत असून बालवाडी द्वारे विद्यार्थांचा पाया भक्क्म होत आहे.

प्रत्येक शाळेला भेट देण्यासाठी समन्वयकांना स्वत:च्या मानधनातूनच खर्च करावा लागतो. तरी शिक्षण विभागाकडील बालवाडी समन्वयकांचे पुर्वीच्या मानधनाऐवजी खालील प्रमाणे मानधन निश्चित करण्यात यावे.

| अ.क्र. | तपशिल/ मानधन टप्पा | सध्याचे मानधन | द्यावयाचे मानधन |
|---|---|---|---|
| १. | १ ते ५ वर्ष सेवा पुर्ण | ७०००/- | १४०००/- |
| २. | ५.१ ते १० वर्ष सेवा पुर्ण | ८०००/- | १६०००/- |
| ३. | १०.१ ते १५ वर्ष सेवा पुर्ण | ९०००/- | १८०००/- |
| ४. | १५.१ ते २० वर्ष सेवा पुर्ण | १००००/- | २००००/- |
| ५. | २० वर्ष पुढे सेवा झालेल्या सर्व बालवाडी शिक्षिका/ सेविका | ११०००/- | २२०००/- |

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाकडील बालवाडी समन्वयकांचे पुर्वीच्या मानधनाऐवजी वरील प्रमाणे मानधन देणेकामी मा. स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाली.

----------

ठराव क्रमांक – ३६ विषय क्रमांक - ०२

दिनांक - २१/०२/२०१८

सुचक : मा. योगिता नागरगोजे अनुमोदक : मा.चंदा लोखंडे

संदर्भ : मा. योगिता नागरगोजे, मा.चंदा लोखंडे यांचा प्रस्ताव –

शिक्षण विभागाच्या एकूण २०६ बालवाड्या आहेत. बालवाडीचे विद्यार्थांना सद्यस्थितीत बसण्यासाठी चट्या उपलब्ध नसल्याने सर्व बालवाड्यांना बैठक व्यवस्थेसाठी चटया पुरविण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाली.

----------

ठराव क्रमांक – ३७ विषय क्रमांक - ०३

दिनांक - २१/०२/२०१८

सुचक : मा.सुलक्षणा धर अनुमोदक : मा.चंदा लोखंडे

संदर्भ : मा.सुलक्षणा धर, मा.चंदा लोखंडे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड शहरामध्ये कायदा व सुव्यवस्था कायम ठेवण्यासाठी पोलिस दल कार्यरत आहे. पोलिस दलामध्ये महिलांचा समावेश लक्षणीय आहे. परंतु या महिला पोलिसांना पोलीस स्टेशनमध्ये सार्वजनिक शौचालयाची सोय नाही. सण, सोहळे, जयंत्या इत्यादी सार्वजनिक कार्यक्रम जेव्हा असतात तेव्हा त्यांना २४-२४ तास कामावर थांबावे लागते त्यामुळे सार्वजनिक शौचालये नसल्यामुळे विनवणी करून खाजगी शौचालयाचा वापर करावा लागतो. काही ठिकाणी तीही सोय नसल्यामुळे या महिलांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण होतो. त्यामुले प्रत्येक पोलिस स्टेशन व चौकीमध्ये महिलांसाठी शौचालय बांधण्याची गरज आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिके मार्फत शहरातील महाविद्यालय, शाळांमध्ये मुलींसाठी सॅनिटरी नॅपकीनचे व्हेंडींग मशिन्स व डिस्पोजल मशिन्स बसविण्याची कार्यवाही चालू आहे. ही अतिशय चांगली गोष्ट आहे. परंतु त्याच बरोबर शहरातील सर्व पोलिस स्टेशन्स मध्येही महिला पोलिसांसाठी सॅनिटरी नॅपकीनचे व्हेंडींग मशिन्स व डिस्पोजल मशिन्स बसविण्याची आतिशय आवश्यकता आहे. कारण या महिला पोलिसांचे कामाचे तास निश्चित नसतात त्यामुळे वरील दोन्ही सुविधा नसल्यामुले या महिला पोलिसांच्या आरोग्यवर गंभीर परिणाम होत आहे. एक सामाजिक जबाबदारी म्हणून पिंपरी चिंचवड मनपा मार्फत शहरातील सर्व पोलिस स्टेशन मध्ये महिला शौचालय व सॅनिटरी नॅपकीनचे व्हेंडींग मशिन्स व डिस्पोजल मशिन्स बसविण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाली.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( **सुनिता हेमंत तापकीर** )
सभापती
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/७९/२०१८
दिनांक : २३/०२/२०१८



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.